# संतोष देशमुख हत्या प्रकरण : मनीषा बिडवे यांचा मोबाईल पोलिसांकडून हस्तगत!

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

## गृहराज्यमंत्री योगेश कदम यांचा मोबाईल सापडला?

बीड । प्रतिनिधी



दिनांक०५/०४/२०२५ रोजी विविध समाज माध्यमांवर व विविध न्यूज पोर्टलवर मा. योगेश कदम, राज्यमंत्री (गृह) महाराष्ट्र राज्य हे मस्साजोग ता. केज येथे आलेले असतांना त्यांचा मोबाईल गहाळ/चोरी गेल्याची बातमी प्रसारित झाली आहे.

परंतु सदर बाबत सत्यता अशी आहे की, मा. मंत्री महोदय हे मस्साजोग येथे धनंजय देशमुख व कुटुंबीयांचे सांत्वन करण्यासाठी धनंजय देशमुख यांचे शेजारी बसलेले होते. पत्रकारांशी संवाद साधताना मोबाईल खाली ठेवला होता त्यानंतर ते बांधकाम सुरू असलेले घराची पाहणी करण्यासाठी चालत गेले. घराची पाहणी करत असताना त्यांनी पीएंकडे मोबाईल मागीतला त्यावेळी पीएंनी माझ्याकडे मोबाईल नाही असे सांगीतले. त्यावेळी मंत्री महोदय यांनी मोबाईल शोधा असे म्हटले. हे वाक्य उपस्थित लोकांपैकी कुणीतरी ऐकून बाहेर वाच्यता केली. परंतु मंत्री महोदय व जिल्हाध्यक्ष अनिल जगताप हे जाण्यासाठी गाडीत बसले असता कोणीतरी मोबाईल आणून अनिल जगताप यांच्याकडे दिला. गाडीत बसल्यानंतर तो मोबाईल जगताप यांनी मंत्री महोदयांना दिला. मंत्री महोदयांना मोबाईल दिला हे बाहेर माहीत नसल्यामुळे या अफवा पसरवल्या गेल्या मंत्री महोदय यांचा मोबाईल गहाळ झालेला नाही. कृपया कोणीही अफवांवर विश्वास ठेऊ नये असे आवाहन बीड पोलीस अधीक्षक श्री.नवनीत काँवत यांनी केले आहे.

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – १९८ ■ रविवार दि.६ एप्रिल २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 198 ■ Sunday Dt.6 April 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# मोबाईलच्या माध्यमातून पुढील धागेदोरे पोलिसांच्या हाती येण्याची शक्यता?

## मनिषा बिडवे या नेमकी कोणाकोणाच्या संपर्कात होत्या? त्यांचे आर्थिक व्यवहार काय होते, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार?

- संतोष देशमुख यांना खोट्या गुन्ह्यात अडकवण्यासाठी मनिषा बिडवेचा वापर केला जाणार होता का?
- हत्या प्रकरणाशी मनिषा बिडवे यांचा काही संबंध होता का? याचाही शोध पोलिस प्रशासन घेणार!
- मोबाईलमुळे दोन्ही हत्या प्रकरणांतील गूढ उकलण्यास मदत होईल, असा पोलिसांना विश्वास!



बीड । प्रतिनिधी

मनीषा बिडवे यांच्या हत्याप्रकरणात मोठी अपडेट समोर आली आहे. पोलिसांनी मनिषा बिडवे यांचा मोबाईल हस्तगत केला असून हा मोठा पुरावा मानला जात आहे. यामुळे मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात मोठा ट्विस्ट येण्याची शक्यता आहे. कारण संतोष देशमुख यांना खोट्या गुन्ह्यात अडकवण्यासाठी मनीषा बिडवेचा वापर केला जाणार होता, त्यामुळेच तिची हत्या केली, असा आरोप सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केला होता.



### मोबाईलमुळे देशमुख हत्या प्रकरणाचे धागेदोरे मिळणार?

आता पोलिसांना मनिषा बिडवे या महिलेचा मोबाईल सापडला असून तो हस्तगत केला आहे. हा मोबाईल आरोपी रामेश्वर भोसले याच्याच घरात पोलिसांना सापडला. रामेश्वरने मनिषाची हत्या केल्यानंतर तिचा मोबाईल पळवला होता आणि नंतर पैशांसाठी विकल्याचे त्याने यापूर्वी सांगितले होते, मात्र आता तो त्याच्याच घरात सापडला.

पान २ वर

### आरोपी रामेश्वर भोसले सुदर्शन घुलेच्या गावचा रहिवासी

दरम्यान, मनिषा बिडवे हत्याप्रकरणातील मुख्य आरोपी रामेश्वर भोसले हा केज येथील रहिवासी आहे. तो संतोष देशमुख हत्याप्रकरणातील आरोपी सुदर्शन घुले याच्या गावात उसतोडणीच्या कामाला होता, अशी माहिती समोर येत आहे. बिडवे यांच्या हत्या प्रकरणातील मुख्य साक्षीदार महादेव घुले हा देखील सुदर्शन घुलेच्या गावचा रहिवासी आहे. या हत्या प्रकरणातील दोन्ही आरोपी आपल्याकडे ऊस तोडणीच्या कामाला होते, अशी माहिती महादेव घुले यांनी दिली आहे. दरम्यान, काही जणांनी मनीषा बिडवे ही संतोष देशमुखांना अडकवण्याच्या कटातील महिला नसल्याचे म्हटले असले, तरी अंजली दमानिया यांच्या आरोपामुळे आणि आता मोबाईल सापडल्याने या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहिले जात आहे. पोलिसांनी दोन्ही आरोपींना अधिक चौकशीसाठी बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील उमरा गावात नेले असून, गावच्या परिसरात आरोपी आणि मनीषा बिडवे यांच्या संबंधांबद्दल अधिक तपास सुरू आहे. या मोबाईलमुळे दोन्ही हत्या प्रकरणांतील गूढ उकलण्यास मदत होईल, असा पोलिसांना विश्वास आहे.

## संतोष देशमुखांपेक्षा जास्त हाल करून मारल, कारागृहातून वाल्मिक कराडची धमकी?

### कारागृह प्रशासन पूर्णपणे वाल्मिक कराडच्या हातामध्ये, तो जसा नाचवतोय तसं प्रशासन नाचत आहे?

### महादेव गित्तेच्या बायकोने केले खळबळजनक आरोप?



बीड । प्रतिनिधी

संतोष देशमुख हत्येतील मुख्य आरोपी वाल्मिक कराड हा बीड जिल्हा कारागृहात आहे. मात्र, त्याला संतोष देशमुख यांच्या हत्येचा कुठलाचा पश्चाताप नसून त्याने महादेव गित्तेला संतोष देशमुख यांच्या पेक्षा जास्त हाल करू मारण्याची धमकी दिल्याचा आरोप मीरा गित्ते यांनी केला आहे. मीरा या महादेव गित्तेच्या पत्नी आहेत.

’ते वाल्मिक कराड म्हणतात आम्ही आणि तुम्ही आत तुरुंगात आहोत म्हणून वाचलात. बाहेर असता तर संतोष देशमुखांचे हाल करून मारलं त्यापेक्षा जास्त हाल करून

पान २ वर

## बीड जिल्ह्यातील नागरिकांच्या तक्रारीचे निवारण होत नसल्यामुळे सर्वसामान्याचे हाल

### जिल्हाधिकारी कार्यालयाकडून नागरिकांनी ईमेलवर केलेल्या तक्रारींकडे दुर्लक्ष?




गेवराई । प्रतिनिधी

बीड जिल्हाधिकारी कार्यालय सर्वसामान्यांच्या हक्कासाठी व नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी जिल्ह्यातील मुख्य कार्यालयीन आहे. बीड जिल्ह्यात असलेल्या प्रत्येक तालुक्यातून व ग्रामीण भागातून अनेक तक्रारी या कार्यालयात तसेच कार्यालयाच्या ईमेल वर दाखल होत आहेत. परंतु ईमेलवर केलेल्या तक्रारीची दखल जिल्हाधिकारी कार्यालयाकडून घेतली जात नसल्यामुळे गोरगरीब नागरिकांसाठी मोठी अडचण निर्माण होत आहे.

प्रत्येक नागरिक आपल्या वेगवेगळ्या समस्या घेऊन या कार्यालयात येत असतात. तसेच स्वतःच्या मोबाईल वरून जिल्हाधिकारी कार्यालयाच्या ईमेलवर आपली

पान २ वर

# कृषिमंत्री कोकाटे तुम्ही शेतकरी कुटुंबात जन्म घ्या : अभिजीत पवार

बीड । प्रतिनिधी
राज्याचे कृषिमंत्री कोकाटे यांनी शेतकऱ्यांबाबत वादग्रस्त वक्तव्य केलेले आहे. पिक कर्ज घेऊन शेतकरी आपल्या मुलीचे लग्न करतात साखरपुडा करतात मग त्यांना कर्जमाफी कशासाठी जायचे अशा पद्धतीचे वेताळ वक्तव्य केल्याने शेतकऱ्यांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. शेतकरी कुटुंबातून जन्म घेऊन प्रत्येक शेतकऱ्यांनी चुकी केली की काय ? कृषिमंत्री कोकाटे तुम्हाला शेतकऱ्यांची जाणीव आहे का ? तुम्हाला अन्नधान्य खायला लागत नसेल म्हणून तुम्ही शेतकऱ्यावर अशा प्रकारचे वक्तव्य करताय, शेतकऱ्यांमुळे आज तुम्ही जिवंत आहात हे तरी लक्षात ठेवा, शेतीमालाला भाव नसल्यामुळे सध्या शेतकरी अडचणीत सापडत आहे. विधानसभा निवडणूक लागण्या अगोदर सरकारने शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करू असे आश्वासन दिले. शेतकऱ्यांनी त्यावर विश्वास ठेवून महायुती सरकारला आपले बहुमूल्य मत देऊन सरकार सत्तेमध्ये आणले. परंतु एकीकडे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणतात की मी कुठेही शेतकऱ्यांचे कर्जमाफी करू असे म्हटले नाही तर दुसरीकडे राज्याचे कृषिमंत्री कोकाटे शेतकऱ्यांविषयी बेताल वक्तव्य करतात. २०13 साली सोयाबीन पिकाला भाव ४५०० रुपये होता साधारणता १७ वर्षांनंतर सुद्धा सोयाबीनचा भाव तोच आहे, सगळ्या गोष्टींच्या किंमती वाढतात मग शेतकऱ्यांच्या शेतीमालाला भाव का नाही. कृषी मंत्री साहेब तुम्ही शेतकरी कुटुंबात जन्माला यायला पाहिजे होते म्हणजे तुम्हाला शेतकऱ्यांविषयी दया आली असती. तुमच्याकडे सरकारची तिजोरी आहे त्यासाठी हजारो गोरगरिबांचे लग्न होतील अशा तुमच्या एका मुलाचे लग्न होतात. मग तुम्हाला आमच्या १ लाख ५० हजार अशा पद्धतीने प्रत्येक शेतकऱ्याकडे कर्ज आहे ते तुम्हाला माफ करणे होईना.



मग तुम्ही निवडणुकी अगोदर आश्वासने का दिली ? अगोदर आश्वासन द्यायची नंतर शेतकऱ्यावर टीका करायची हाच तुमचा धंदा की काय ? गेली सात वर्ष झालं शेतकऱ्यांकडे बँकेचे कर्ज आहे तरी शेतकरी नवीन जुने तरी करतोय तुमच्याकडे अनेक वर्षांपासून शासनाचा निधी मधून तुम्ही जगताय म्हणून तुम्हाला शेतकरी कुटुंबाची जाणीव नाही. कृपा करून शेतकऱ्यांवर अशा प्रकारच्या टीका करू नका. तुम्हाला शेतकऱ्यांच्या रोषाला सामोरे जावे लागणार आहे. आम्ही शेतकरी मुलींचे लग्न करू साखरपुडा करू मात्र तुम्ही सरकारच्या निधीमध्ये खुश रहा. तुम्हाला कर्जमाफी करायची नसेल तर शेतकऱ्यांवर अशा प्रकारचे बेताल वक्तव्य तरी करू नका अशी विनंती शेतकरी पुत्र अभिजीत पवार यांनी केली आहे.

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या शब्दावर आंदोलन मागे !

# निलंबन मागे घेतले जात नाही तोपर्यंत मागे हटणार नाही : रोहन गलांडे पाटील

केज । प्रतिनिधी
बीड जिल्हा शल्यचिकित्सक डॉ आशोक थोरात यांचे निलंबन मागे घेण्यात यावे या मागणीसाठी ५ एप्रिल रोजी अत्मदहनाच्या इशाऱ्यांचे आंदोलन रोहन गलांडे यांनी २६ एप्रिल पर्यंत स्थगित केले आहे कारण सरकार निलंबन मागे घेण्यासाठी वेळ मागु करत आहे तसेच उपमुख्यमंत्री बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी २ एप्रिल रोजी सभेत बोलताना म्हटले की निलंबन मागे घेण्यात येईल त्यामुळे रोहन गलांडे पाटील यांनी ५ एप्रिल रोजीचा अत्मदहनाचे आंदोलन स्थगित करत केला आहे परंतु येणाऱ्या २६ एप्रिल पर्यंत निलंबन मागे घेतले नाही तर २६ एप्रिल रोजी श्री संत नामदेव महाराज सभागृह चिंचोली माळी येथे अत्मदहन करणार आहे असे सरकारला कळविण्यात येते तरी २६ एप्रिल रोजी माझे काही बरे वाईट झाले तर सरकार, प्रशासन जबाबदार राहील असे निवेदन रात्री १२ वाजता केज तहसीलदार, पोलीस प्रशासनाला देण्यात आले आहे असे निवेदनाद्वारे रोहन गलांडे पाटील यांनी काल रात्री १२ वाजता पोलीस प्रशासन चिंचोली माळी येथे रोहन गलांडे पाटील यांच्या घरी आले असता त्यांनी पोलिस प्रशासनाला व केज तहसीलदार यांना निवेद्वारे म्हटले आहे तरी डॉ आशोक थोरात यांचे निलंबन २६ एप्रिल पर्यंत स्थगित केले आहे परंतु निलंबन मागे घेतले जात नाही तोपर्यंत मागे हटणार नाही असे रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे.





महाराष्ट्र राज्याचे अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य (सचिव दर्जा) मा. ॲड. गोरक्षजी लोखंडे साहेब बीड शासकीय विश्रामगृह येथे आले असताना त्यांच्या सत्कार करताना राजु महुवाले, नितीन महुवाले, ओमकार नितीन महुवाले

# डॉ. विठ्ठल जाधव यांच्या कवितासंग्रहास पुरस्कार

शिरूर कासार । प्रतिनिधी
येथील साहित्यिक डॉ. विठ्ठल जाधव यांच्या 'अटर का पटर' या बालकविता संग्रहाला पंढरपूर येथे मराठी साहित्यासाठी ज्ञानवर्धिनी राज्यस्तरीय बालसाहित्य पुरस्कार दि.१ एप्रिल रोजी प्रदान करण्यात आला. शिक्षक आ. दत्तात्रय सावंत, आयुर्वेदाचार्य बाबुशेठ पांडकर, राजेश पवार, विठ्ठल सह. साखर कारखान्याचे संचालक धनंजय काळे, समाधान गाजरे यांचे हस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले. बालमनाचे कांगोरे विस्तारणाऱ्या या कवितासंग्रहात राष्ट्रभक्ती, पशूपक्षी, निसर्गपर कविता असून बालविश्व कवितेतून साकारले आहे. नांदेड येथील इसाप प्रकाशनचे दत्ता डांगे यांनी निर्मिती केली असून प्रसिद्ध चित्रकार शीतल शहाणे यांनी चित्र रेखाटलेले आहेत. पुरस्कार वितरण प्रसंगी अरविंद पवार, हेमंत पवार, अमोल चव्हाण, संजीवनी जाधव यांची उपस्थिती होती. सुत्रसंचलन साहित्यिक अंकुश गाजरे यांनी केले तर आभार प्रकाश गाजरे यांनी मानले.

पान १ वरून...

### मोबाईलच्या माध्यमातून पुढील धागेदोरे...

मनिषा बिडवे हिचा काही दिवसांपूर्वी कळंब येथे तिच्या राहत्या घरी खून करण्यात आला होता. तिचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत सापडला होता. याप्रकरणी पोलिसांनी तिचा ड्रायव्हर रामेश्वर भोसले याच्यासह दोन आरोपींना अटक केली होती. मनीषाच्या छळाला आणि ब्लॅकमेलिंगला कंटाळून तिची हत्या केल्याची कबुली रामेश्वरने दिल्याचे वृत्त होते.

**मोबाईलमुळे देशमुख हत्या**

सापडलेला मोबाईल डिस्चार्ज असून, या मोबाईलच्या माध्यमातून पुढील धागेदोरे पोलिसांच्या हाती येण्याची शक्यता आहे. मनिषा नेमकी कोणाकोणाच्या संपर्कात होती?, तिचे आर्थिक व्यवहार काय होते? तिचा संतोष देशमुख हत्या प्रकरणाशी काही संबंध होता का? याचाही शोध पोलिस घेणार आहे.

### कारागृहातून वाल्मिक कराडची धमकी?...

मारलं असतं असे मीरा गित्ते यांनी सांगितले. मीरा गित्ता यांनी दावा केला की, बीड कारागृहात वाल्मिक कराड याला व्हिआयपी ट्रिटमेंट मिळत होती. त्याला महादेव गित्ते विरोध केला. त्यामुळे कारागृहात कराडच्या गँगने आपले पती महादेव गित्ते यांना मारहाण केली. या मारहाणीचे प्लॅनिंग तीन दिवस आधीच करण्यात आले होते. कारागृह प्रशासन पूर्णपणे वाल्मिक कराडच्या हातामध्ये आहे. तो जसा नाचवतोय तसं प्रशासन नाचत आहे. वाल्मिक कराडला त्या जेलमधून हलवायला हवं होतं. पण माझ्याच पतीला हलवलं. वाल्मिकला व्हिआयपी ट्रीटमेंट मिळत होती. त्याविरोधात माझ्या पतीने आवाज उठवला. म्हणून त्यांना बाहेर काढलं.

**सीसीटीव्ही फुटेज का देत नाही?**

वाल्मिक कराड आणि सुदर्शन घुले याला महादेव गित्ते याने मारहाण केल्याची चर्चा होती. मात्र,कारागृह प्रशासना वाल्मिक कराड आणि महादेव गित्ते यांच्यात काहीच वाद झाला नसून मारहाणीचा दावा खोटा असल्याचे म्हटले होते. त्यावर मीरा गित्ते यांनी आपल्या पतीलाच वाल्मिक कराडच्या माणसांकडून कारागृहात मारहाण झाली. मी कारागृह प्रशासनाकडे सीसीटीव्ही फुटेज मागत आहे मात्र ते देत नाही. देत फुटेज का देत नाही याचे कारण त्यांनी सांगावे.

### बीड जिल्ह्यातील नागरिकांच्या तक्रारीचे...

तक्रार करतात परंतु तात्काळ या तक्रारीवर कारवाईचे निर्देश न करता या कारवाईला विलंब केला जातो. येथील अधिकारी-कर्मचारी हळुवार गतीने कर्तव्यावर काम करत असल्यामुळे या संदर्भात अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत. ज्या लोकांना कार्यालयापर्यंत येणे शक्य नसल्याने ते लोक जिल्हाधिकारी कार्यालयाच्या ईमेलवर आपली तक्रार दाखल करतात. मात्र या तक्रारीतून कुठलीही कारवाई होत नसल्याने सर्वसामान्य नागरिकात प्रशासनाच्या कर्तव्याबद्दल प्रश्नचिन्ह? निर्माण झाला आहे. जर थेट दाखल केलेल्या तक्रारीचे निवारण या कार्यालयातून होत नसेल तर ईमेलवरच्या तक्रारीचे काय निवारण होईल हेही तितकेच महत्त्वाचे आहे. जिल्ह्यात अनेक ठिकाणी दररोज वेगवेगळ्या समस्या निर्माण होतात आणि याच्या तक्रारी देखील या कार्यालयात दाखल होतात परंतु या कार्यालयातून तक्रारीची दखल न घेतल्यामुळे नागरिकात संताप व्यक्त केला जात आहे. म्हणून जिल्हाधिकारी अविनाश पाठक साहेब याकडे आपण लक्ष घालावे आणि ईमेलवर येत असलेल्या तक्रारींची निवारण करावे अशी मागणी होत आहे.

# जागतिक आरोग्य दिन २०२५ आरोग्यम् धनसंपदा - निरोगी जीवन, समृद्ध भविष्यासाठी

**७ एप्रिल हा दिवस जागतिक आरोग्य दिन म्हणून जगभरात साजरा केला जातो. आरोग्याचे महत्त्व सर्वश्रुत आहे. त्यासाठी हा लेखन प्रपंच ! आरोग्याचे महत्व : आरोग्य हाच खरा धनसंपदा आहे या उक्तीप्रमाणे चांगले आरोग्य हे वैयक्तिक, सामाजिक आणि आर्थिक समृद्धीसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. आरोग्य चांगले असल्यासच आपण जीवनातील विविध क्षेत्रांत यश संपादन करू शकतो. आरोग्य म्हणजे केवळ आजार नसणे, तर ते शारीरिक, मानसिक आणि सामाजिक स्तरावर चांगले असणे होय. चांगले आरोग्य आपल्याला आनंदी, उत्पादक आणि चांगले जीवन जगण्यास मदत करते, ज्यामुळे व्यक्ती आणि समाजालाही फायदा होतो.**




आरोग्याचे महत्व : शारीरिक आरोग्य यात निरोगी शरीर आपल्याला दैनंदिन कामांसाठी आवश्यक ऊर्जा आणि क्षमता प्रदान करते, ज्यामुळे आपण कामावर लक्ष केंद्रित करू शकतो आणि चांगले जीवन जगू शकतो. मानसिक आरोग्य : मानसिक आरोग्य चांगले असल्यास, आपण तणाव आणि चिंता कमी करू शकतो, आत्म-समर्पणाने निर्णय घेऊ शकतो आणि सकारात्मक दृष्टीकोन ठेवतो. सामाजिक आरोग्य : चांगले आरोग्य आपल्याला इतरांसोबत चांगले संबंध निर्माण करण्यास मदत करते, ज्यामुळे आपण समाजात सक्रिय आणि समाजात योगदान देऊ शकतो. उत्पादकता : चांगले आरोग्य आपल्याला कामावर लक्ष केंद्रित करण्यास आणि अधिक प्रभावीपणे काम करण्यास मदत करते, ज्यामुळे आपण आपल्या ध्येयांपर्यंत लवकर पोहोचू शकतो. दीर्घायुष्य : निरोगी जीवनशैली आणि चांगले आरोग्य आपल्याला दीर्घायुष्य जगण्यास मदत करतात. रोग प्रतिबंध : चांगले आरोग्य आपल्याला अनेक रोगांपासून दूर ठेवते आणि रोग झाल्यास, आपण लवकर आणि प्रभावीपणे उपचार करू शकतो. कल्याण : आरोग्य केवळ शारीरिक नसून, ते मानसिक, सामाजिक आणि भावनिक स्तरावरही चांगले असणे आवश्यक आहे, जेणेकरून व्यक्तीला चांगले जीवन जगता येईल. वन हेल्थ : मानवांचे आरोग्य, पाळीव आणि वन्य प्राणी, वनस्पती आणि व्यापक पर्यावरण (परिसंस्थांसह) जवळून जोडलेले आणि परस्पर अवलंबून असल्याचे ओळखणे .

आरोग्याची व्याप्ती : आरोग्याची व्याप्ती खूप विस्तृत आहे, ज्यात खालील गोष्टींचा समावेश होतो. वैयक्तिक आरोग्य : यात व्यक्तीची स्वतःची काळजी घेणे, योग्य आहार घेणे, नियमित व्यायाम करणे, पुरेशी झोप घेणे, तणाव व्यवस्थापन आणि नियमित वैद्यकीय तपासणी करणे यांचा समावेश होतो. सामुदायिक आरोग्य : यात समाजातील लोकांच्या आरोग्याची काळजी घेणे, स्वच्छ पाणी आणि स्वच्छता व्यवस्था, आरोग्य सेवांची उपलब्धता, आणि आरोग्य शिक्षण यांचा समावेश होतो. जागतिक आरोग्य : यात जागतिक स्तरावर आरोग्याच्या समस्यांवर लक्ष देणे, रोग नियंत्रण, आपत्कालीन आरोग्य व्यवस्थापन आणि आंतरराष्ट्रीय आरोग्य सहकार्य यांचा समावेश होतो. पर्यावरणाचे आरोग्य यात पर्यावरणाची काळजी घेणे, प्रदूषण कमी करणे, आणि नैसर्गिक संसाधनांचा योग्य वापर करणे यांचा समावेश होतो, जेणेकरून आपले आरोग्य आणि पर्यावरणाचे आरोग्य चांगले राहील.

२ . जगभरातील आरोग्यविषयक संशोधन आणि उपचार पद्धती : आरोग्य क्षेत्रात सतत नवनवे शोध लागत आहेत. काही प्रमुख संशोधन आणि उपचार पद्धती पुढीलप्रमाणे आहेत. भारतात अनेक प्राचीन आणि पारंपरिक उपचार पद्धती आहेतप, ज्यामध्ये आयुर्वेद, योग, युनानी, सिद्ध आणि निसर्गोपचार यांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त, होमिओपॅथी आणि आधुनिक वैद्यकीय पद्धती देखील रूढ आहेत.

आयुर्वेद : आयुर्वेद ही प्राचीन भारतीय वैद्यकीय प्रणाली आहे, जी मानवाच्या शरीराची रचना, आरोग्य आणि आजार यावर आधारित आहे. या पद्धतीत नैसर्गिक उपायांवर भर दिला जातो, जसे की औषधी वनस्पती, आहार आणि जीवनशैलीतील बदल.

योग : योग ही एक शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक पद्धत आहे, जी ध्यान, प्राणायाम आणि आसनांवर आधारित आहे. योग केल्याने शारीरिक आणि मानसिक आरोग्याला मदत होते.

युनानी : युनानी ही प्राचीन भारतीय वैद्यकीय प्रणाली आहे, जी ग्रीक आणि अरब वैद्यकीय ज्ञानावर आधारित आहे. या पद्धतीत नैसर्गिक औषधे आणि उपायांवर भर दिला जातो.

सिद्ध : सिद्ध ही दक्षिण भारतातील एक पारंपरिक वैद्यकीय प्रणाली आहे, जी नैसर्गिक उपायांवर आधारित आहे. या पद्धतीत धातू आणि खनिजांचा वापर औषध म्हणून केला जातो.

निसर्गोपचार : निसर्गोपचार म्हणजे निसर्गाच्या मदतीने आजार बरे करण्याची पद्धत. या पद्धतीत पाणी, हवा, सूर्यप्रकाश आणि नैसर्गिक पदार्थांचा वापर केला जातो.

होमिओपॅथी : होमिओपॅथी ही एक वैद्यकीय प्रणाली आहे, जी नियम (लॉ ऑफ सिमिलर्स) या तत्त्वावर आधारित आहे. या पद्धतीत अत्यंत पातळ प्रमाणात औषधे दिली जातात.

आधुनिक वैद्यकीय पद्धती (ऍलोपॅथी) : या पद्धतीत शस्त्रक्रिया, औषधोपचार आणि आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानाचा वापर केला जातो.

चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके
तहसीलदार, बीड

३. नवीन आजार आणि त्यासंबंधी काळजी : हृदयविकार, मधुमेह आणि कर्करोग हे प्रमुख जीवनशैली - संबंधित आजार वाढत आहेत. नियमित आरोग्य तपासणी आणि संतुलित आहार यामुळे यावर नियंत्रण ठेवता येते.

मानसिक आरोग्य समस्यांचा वाढता धोका : नैराश्य, चिंता आणि तणाव यावर उपाय म्हणून ध्यान, योग, समुपदेशन आणि कुटुंबाच्या पाठिंबा गरजेचा आहे.

४. कोरोना आणि इतर साथीचे रोग : कोरोनासारख्या साथीच्या रोगांवर प्रभावी लसीकरण, स्वच्छता आणि आरोग्यदायी सवयींचा अवलंब करणे गरजेचे आहे. डेंग्यू, मलेरिया, क्षयरोग यांसारख्या संसर्गजन्य रोगांवर वेळीच प्रतिबंधात्मक उपाय करणे आवश्यक आहे.

५. विविध गटांचे आरोग्य : यात बाल आरोग्य, त्यांचे कुपोषण, लसीकरण आणि योग्य पोषणावर भर दिला जातो.

स्त्रियांचे आरोग्य यात मासिक पाळी स्वच्छता, प्रसूती काळातील काळजी आणि स्तन कर्करोग जनजागृती यावर भर असतो.

वृद्धांचे आरोग्य : यात संधिवात, उच्च रक्तदाब, स्मृतिभ्रंश यांसारख्या आजारांवर नियंत्रणासाठी योग्य आहार, व्यायाम आणि औषधोपचार आवश्यक आहे.

६ . भारत आणि महाराष्ट्रातील आरोग्यव्यवस्था :- भारतात सरकारी आणि खाजगी आरोग्यसेवा सुधारत आहे. महाराष्ट्रात महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना आणि आयुष्यमान भारत यांसारख्या योजना गरीब आणि गरजूंसाठी उपयुक्त ठरत आहेत. राज्यातील नागरिकांना पुरेशा, दर्जेदार आणि प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा प्रदान करण्यासाठी महाराष्ट्र सरकार वचनबद्ध आहे. निरोगी राज्ये, प्रगतीशील भारत या नीती आयोगाच्या अहवालाच्या दुसऱ्या आवृत्तीनुसार आरोग्यविषयक एकंदर कामगिरीच्या बाबतीत केरळ आणि आंध्र प्रदेशसह महाराष्ट्र राज्य अव्वल स्थानी आहे . गर्भधारणेपासून वयाच्या सोळाव्या वर्षापर्यंतचे सर्व लसीकरण सरकारतर्फे मोफत केले जाते . या लसी सर्व सरकारी आरोग्य केंद्रांवर मोफत उपलब्ध आहेत . यात तुमच्या आरोग्याबाबत जाणून घ्या , बीएमआय तपासा , तुमची पावले मोजा , झोप पुरेशी होते का , ते बघा . उष्मांक सेवनाचा मागोवा घ्या , फिट इंडिया उपक्रमांमध्ये सहभागी व्हा , अनुरूप आहार योजना जाणून घ्या .

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना :- ही राज्य सरकारतर्फे राबवली जाणारी आरोग्य विमा योजना आहे . या योजनेच्या माध्यमातून शासकीय आणि खाजगी क्षेत्रातील सेवा प्रदात्यांमार्फत सूचिबद्ध आजारांवर रोखरहित उपचार केले जातात .

महाराष्ट्रात महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेसह आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना एकत्रितपणे सुरू करण्यात आली आहे . या योजनेंतर्गत शासकीय आणि खाजगी रुग्णालयामार्फत पात्र शिधापत्रिकाधारक आणि इतर लाभार्थी गटांना सूचिबद्ध आजारांवर मोफत वैद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहेत . आरोग्य सेतू यंत्रणा ही संपर्क , मागोवा तंत्राचा वापर करते . तुम्ही रोजची कामे करत असताना ज्यांच्या संपर्कात आला असाल त्या सर्व लोकांच्या तपशीलांची नोंद करते . तुमच्या संपर्कात आलेल्या व्यक्तींपैकी कोणीही कधीही कोवीडग्रस्त झाल्याचे आढळल्यास , तुम्हाला त्याबाबत तात्काळ माहिती दिली जाते आणि तुमच्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांची व्यवस्था केली जाते .

आरोग्य सेतू ॲपमध्ये नोंदणी करण्यासाठी तुमच्याकडे भारतात वापरात असलेला मोबाइल नंबर असणे गरजेचे आवश्यक आहे . ॲंड्रॉइड आवृत्ती ५ आणि त्यापेक्षा प्रगत, आय ओ एस आवृत्ती १०. ३ आणि त्यापेक्षा प्रगत . ईसंजीवनी नोंदणी ही दूरस्थ माध्यमातून आरोग्यसंबंधी सल्ला ( ओ पी डी ) देणारी सेवा आहे . नागरिक स्नेही असणाऱ्या या उत्कृष्ट सेवेची काही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत - रुग्ण नोंदणी , टोकन , रांगेचे व्यवस्थापन , डॉक्टरांशी ऑडिओ - व्हिडिओ सल्लामसलत , ई-प्रिस्क्रीप्शन , एसएमएस / ईमेल सूचना , राज्यातील डॉक्टरांतर्फे सेवा , विनामूल्य सेवा इत्यादी . बाल कुपोषणाच्या समस्येवर मात करण्यासाठी अंगणवाडी हा उपक्रम भारत सरकारतर्फे राबवला जातो . 'अंगणातला निवारा ' असा 'अंगणवाडी ' या शब्दाचा अर्थ इथे अभिप्रेत आहे . महाराष्ट्रात सुमारे १०८००५ अंगणवाडी आणि लघु अंगणवाडी केंद्रे आहेत . तब्बल ४००० पेक्षा जास्त पर्यवेक्षक आणि सुमारे दोन लाख अंगणवाडी कामगार / मदतनीसांच्या सहाय्याने संपूर्ण राज्यभरात आणि राज्याच्या कानाकोपऱ्यात हा उपक्रम यशस्वीपणे राबविला जातो आहे .

संपूर्ण आरोग्याच्या दृष्टीने मानसिक आणि शारीरिक आरोग्य हे दोन्ही पैलु सारखेच महत्त्वाचे आहेत . टेली मानस या उपक्रमाच्या माध्यमातून सरकारने नागरिकांसाठी व्यापक मानसिक आरोग्यासंबंधी सेवा प्रदान केली आहे . या सेवेचा लाभ घेण्यासाठी तुम्ही १४४१६ किंवा १८०० ८९१ ४४१६ या टोल फ्री क्रमांकांवरून सल्लागारांशी संपर्क साधू शकता .

७. जागतिक आरोग्य संघटना आरोग्याच्या जागतिक धोरणांवर कार्यरत आहे आणि साथीच्या रोगांवर नियंत्रण , लसीकरण कार्यक्रम आणि सार्वजनिक आरोग्य सुधारण्यासाठी प्रयत्नशील आहे .

८. समाज आरोग्य आणि आरोग्यदायी जीवनशैली :- नियमित व्यायाम , संतुलित आहार , तणावमुक्त जीवनशैली , पुरेशी झोप आणि स्वच्छता यावर भर देणे आवश्यक आहे .

निष्कर्ष :- जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने , प्रत्येकाने आरोग्यदायी सवयी अंगीकारून निरोगी जीवन जगण्याचा संकल्प करावा. सर्वांसाठी उत्तम आरोग्य हे ध्येय साकारण्यासाठी व्यक्ती, समाज आणि शासनाने एकत्र येऊन प्रयत्न करणे गरजेचे आहे.

# गेवराई शहरात एकही कुटुंब बेघर राहू नये याची काळजी घ्या : आ.विजयसिंह पंडित

## प्रधानमंत्री आवास योजना २.० चा आ.विजयसिंह पंडित यांच्या शुभहस्ते प्रारंभ

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई शहरात एकही व्यक्ती किंवा कुटुंब बिगर राहू नये याची काळजी घ्या, ज्यांच्याकडे जागा नाही त्यांनाही घरकुल मिळेल असे प्रतिपादन आमदार विजयसिंह पंडित यांनी केले आहे. सर्वांसाठी घर या संकल्पनेवर आधारित प्रधानमंत्री आवास योजना २.० चा गेवराई नगर परिषद अंतर्गत अमोलबजावणीचा शुभारंभ करतावेळी आमदार विजयसिंह पंडित बोलत होते. त्यांच्या शुभहस्ते व्यापारी गाळेधारकांना प्रतिनिधिक स्वरूपात चावी वितरित करून गाळयांचा ताबा देण्यात आला. शहरातील अतिक्रमण धारकांना हक्काचा पीटीआर देणेबाबत आमदार विजयसिंह पंडित यांनी आढावा घेतला यावेळी जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित उपस्थित होते.

गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आमदार विजयसिंह पंडित यांच्या शुभहस्ते गेवराई नगरपरिषद अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना




२.० या घरकुल योजनेच्या अंमलबजावणीचा शुभारंभ शुक्रवार, दि.४ एप्रिल रोजी करण्यात आला. यावेळी जी भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित, मुख्याधिकारी विक्रम मांडुरके, नायब तहसीलदार सोनवणे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. शहरातील संजय नगर, भीम नगरसह आदी भागातील अतिक्रमणधारकांच्या हक्काच्या पीटीआर संदर्भातील सुरू असलेल्या प्रशासकीय प्रक्रियेचा आढावा घेण्यात आला.

पीटीआर मिळणेबाबत १३४७ अर्जदारांनी पुराव्यासह अर्ज केले असून या महिना अखेर प्राप्त अर्जाची छाननी करून हक्काचा पीटीआर मिळणार आहे. त्याचबरोबर गेवराई शहरात सर्वांसाठी घरी या संकल्पनेची पारदर्शक अमलबजावणी करून शहरात एकही कुटुंब बेघर राहणार नाही याची काळजी आपण घेऊ असे प्रतिपादन आमदार विजयसिंह पंडित यांनी यावेळी केले.

व्यापारी गाळ्यांच्या लिलावानंतर पूर्ण रक्कम भरूनही केवळ राजकीय द्वेषातून मागील अनेक वर्षापासून व्यापारी गाळयांच्या ताब्यापासून वंचित असलेल्या व्यापाऱ्यांना दिलासा देण्याचे काम आमदार विजयसिंह पंडित यांनी केले. व्यापारी गाळ्यांच्या संदर्भात त्यांनी आवश्यक मान्यता शासन स्तरावर मिळून आज प्रातिनिधीक स्वरूपात गाळे धारकांना चावी देऊन व्यापारी गाळ्यांचा ताबा आमदार विजयसिंह पंडित यांच्या हस्ते देण्यात आला आहे.

## भारतीय जनता पार्टी मंडल किल्ले धारूरचा वतीने भाजपा स्थापना दिन साजरा



धारूर । प्रतिनिधी

किल्ले धारूर येथे दि.६ एप्रिल रोजी सकाळी ०९.३० भारतीय जनता पार्टी स्थापना दिवस म्हणून पक्षाचा ध्वजारोहण भाजपाचे प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा नगराध्यक्ष डॉ. स्वरूपसिंह हजारी साहेब यांच्या हस्ते कॅप्टन राजपालसिंहा इंग्लिश स्कूल येथे ध्वजारोहण करण्यात आले तसेच डॉ स्वरुपसिंह सिंह हजारी साहेब यांनी भारतीय जनता पार्टी चे कार्यविषयी स्वीसतर माहिती डॉ. हजारी साहेब यानी उपस्थित बुथ प्रमुख सर्व कार्यकर्ता याना दिली व स्थापना दीना निमित शुभेच्छा दिल्या.

तसेच या वेली भारतीय जनता पार्टी प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा नगर अध्यक्ष डॉ स्वरुपसिंह सिंह हजारी साहेब तालुका अध्यक्ष एडवोकेट बालासाहेब चोले शहर अध्यक्ष दत्ता भाऊ धोत्रे भाजपा युवा मोर्चा शहर अध्यक्ष एडवोकेट मोहन भोसले सोशल मीडिया सयोजक रोहनसिंह हजारी नगर सेवक सचिन दुबे नगर सेवक बालाजी चव्हान नगर सेवक सुरेश लोकरे युवा नेते संदीप काचगुंडे युवा नेते रामप्रभु मुंडे सर चिटनिस एडवोकेट नवनाथ पांचाल ज्येष्ठ अहमद भाई युवा नेते नदीम मोमिन फारुख भाई शेख मोबिन सुखदेव चोले दिलीपराव कापसे रामेश्वर गवली ग्रामपंचाय सदस्य समाधान चादने भगवान नायकवाडे लियाकत तांबोली सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

# विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव रमाई नगर नाळवंडीची कार्यकारणी जाहीर

## अध्यक्षपदी पत्रकार अमोल जाधव तर सचिव पदी रोशन कानडे यांची सर्वानुमते निवड

बीड । प्रतिनिधी

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी महामानव, भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार विश्वरत्न, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त विविध आणि आदर्श सामाजिक उपक्रम राबवून जयंती साजरा करण्याचा निर्णय आज प्रज्ञासूर्य मित्र मंडळाने हाती घेतला आहे. या जयंतीच्या अनुषंगाने काही पदाधिकाऱ्यांची कार्यकरणी जाहीर करून निवड करण्यात आली. ही कार्यकारणी जाहीर करत असताना रमाई नगर परिसरातील जेष्ट, युवक यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्रज्ञासूर्य मित्र मंडळाच्या सदस्याच्या नेतृत्वाखाली बैठक पार पाडून पुढील





प्रमाणे कार्यकारणी जाहीर करण्यात आली.

या वेळी अध्यक्ष पदी युवा पत्रकार अमोल जाधव, उपाध्यक्षपदी रोहन जाधव, सचिवपदी रोशन कानडे, कोषाध्यक्षपदी अनिल लांडगे यांची सर्वानुमते निवड करून त्यांचे स्वागत करून पुढील वाटचालीस सुभेच्छा दिल्या. या वेळी या प्रसंगी उपस्थित युवा नेते मसु जाधव, अजय जाधव, किरण जाधव, प्रेम कोकाटे, तेजस जाधव, सागर जाधव, सचिन कानडे, अशोक कानडे, गणेश कानडे, आदित्य जाधव, आदित्य जाधव, त्याच बरोबर अनेक जेष्ट या ठिकाणी उपस्थित होते.

ही कार्यकारणी जाहीर करत असताना दरवर्षी प्रमाणे याही वर्षी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने भव्य असे सामाजिक आदर्श कार्यक्रम राबवून महामानवाची जयंती साजरा करण्याचा निर्णय देखील जयंती उत्सव समितीने हाती घेतला आहे.

### आदर्श भीमजयंतीचे साक्षीदार व्हा– पत्रकार अमोल जाधव

रमाई नगर नाळवंडी येथे एक अनोखी जयंती आपल्याला पहावयास मिळणार आहे या अनोख्या आणि आदर्श भीमजयंतीला खेडेगावातील तसेच परिसरातील सर्व आंबेडकरी प्रवर्गाने मोठ्या संखेने उपस्थित राहावे आणि या भीमजयंतीचे साक्षीदार व्हावे असे आव्हान या वेळी करण्यात आले आहे. या वेळेस रमाई नगर मध्ये प्रज्ञासूर्य मित्र मंडळाच्या वतीने सलग तीन दिवसाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आसून सर्वांना या आकर्षक जयंतीचा आनंद घेता येणार आहे. समितीने आयोजित केलेल्या या कार्यक्रमाने जयंती आदर्श ठरणार आसून सर्वानी उपस्थित राहावे.

# लिंबागणेश येथे संत कैकाडी महाराज यांची जयंती व रामनवमी उत्साहात साजरी

लिंबागणेश । प्रतिनिधी

मानवानो माणुसकीला जागा हा महामंत्र देणारे राष्ट्रसंत, महान तपस्वी संत राजाराम महाराज म्हणजेच कैकाडी महाराज यांची जयंती आणि रामनवमी आज दि.६ रविवार रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील ग्रामपंचायत कार्यालयात प्रभु रामचंद्र आणि कैकाडी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रीफळ फोडून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी सरपंच बालासाहेब जाधव होते. कार्यक्रमाचे प्रस्तावित रमेश गायकवाड यांनी केले तर सुत्रसंचलन हरिओम क्षीरसागर यांनी केले. डॉ.गणेश ढवळे यांनी आभार मानले.

कीर्तने, प्रवचने, अंधश्रद्धा निर्मूलन, बालविवाह प्रतिबंध, अस्पृश्यता निर्मूलन याद्वारे समाज प्रबोधन करून सर्व जगाला एकात्मतेची शिकवण देणारे महान तपस्वी कैकाडी महाराज यांचा जन्म राम नवमीला इ.स.१९०७ मध्ये अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील मांडवगण या गावी झाला. राष्ट्रसंत श्री कैकाडी महाराजांनी आपल्या कारकिर्दीत कोणाकडूनही पैसे घेतले नाहीत. तसेच ते कपडेही



फार कमी वापरायचे. साधी राहणे व कधीही अन्न वाया जाऊ देत नसत. तसेच कोणालाही पाया पडू देत नसत तुम्ही देव होऊ नका, संत होऊ नका, तुम्ही फक्त माणस व्हा माणसं हा संदेश ते समाजाला देत होते. हे विश्वचि माझे घर अशी भावना निर्माण झाल्याने त्यांनी समाज परिवर्तनासाठी स्वतःचा देह झिजवला. त्यांनी संपूर्ण भारतभ्रमण केले त्यामुळे त्यांना कन्नड, तेलगू अशा भाषा येत होत्या. त्यांनी महाराष्ट्रासह अनेक प्रांतामध्ये जाऊन समाज प्रबोधन केले. पंढरपूर येथे मंदिर बांधण्यासाठी भाविकांकडून त्यांनी सहस्त्रकोटी नाम जप करून घेतला. कैकाडी मठ हे पंढरपूरचे आकर्षण आहे. भारताच्या ऐतिहासिक आणि प्राचीन काळामधील या मठात भारत माता मंदिर आहे. या मंदिरामध्ये स्वर्गलोक, पृथ्वीलोक आणि पातळ अशी या मठाची निर्मिती करण्यात आलेली आहे.

माशाच्या तोंडाच्या तोंडासारखा मठाच्या प्रवेशद्वाराचा आकार तयार करण्यात आलेला आहे. विविध देवदैवतांच्या, संतांच्या, महापुरुषांच्या, क्रांतिकारकांच्या मुर्त्या या ठिकाणी बसविण्यात आले आहेत. मठाचे सविस्तर वर्णन सांगितले. ह.भ.प. अनंतकाका मुळे यांनी मर्यादा पुरुषोत्तम प्रभु रामचंद्र यांच्या जीवनावर आधारित प्रवचन केले. यावेळी राजेभाऊ गिरे, ग्रामपंचायत सदस्य दामोदर थोरात, महादेव कुदळे, बाळकृष्ण थोरात, दादा गायकवाड, तुकाराम गायकवाड, संजय घोलप, अँड गणेश वाणी, संतोष भोसले, अंकुश गायकवाड, रामदास मुळे, श्रीराम वायभट, सुरेश ढवळे, सुरेश निर्मळ आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# गजानन बँकेला एक कोटी तीस लाखाचा नफा

बीड । प्रतिनिधी

सर्वांना आपलं मानणारी आपली बँक या दृढ विश्वासाने २०८ कोटी ३५ लाख ४५ हजार व्यवसाय असलेल्या श्री गजानन नागरी सहकारी बँकेला मार्च २०२५ अखेर नेट नफा एक कोटी तीस लाख ७४ हजाराचा झाला आहे अशी माहिती बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम आर क्षीरसागर व सर व्यवस्थापक डॉ शेख एम एस यांनी दिली आहे. बँकेचे अध्यक्ष तथा माजी मंत्री जयदत्त सोमाजीराव क्षीरसागर यांचे नियोजनबद्ध निर्णय व अभ्यासू मार्गदर्शन लाभले आहे तसेच बँकेचे उपाध्यक्ष जगदीश काळे व संचालक मंडळाचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. बँकेची ३१ मार्च २०२५ वरील वित्तीय स्थितीमध्ये बँकेचे भाग भांडवल पाच कोटी दहा लाख ६६ हजार, राखीव व इतर निधी १८ कोटी १९ लाख ६६ हजार, नेटवर्क १९ कोटी ६० लाख ५६ हजार, ठेवी १२७ कोटी ५५ लाख ४० हजार, कर्जे ८० कोटी ८८ लाख पाच हजार, गुंतवणूक ४६ कोटी ४८ लाख ६१ हजार, सीडी रेशो ६३. ४१ टक्के, ग्रॉस एनपीए ३. ०५%, नेट एनपीए झिरो टक्के, भांडवल पर्याप्त रेशो २६.५२% आहे बँक रिझर्व बँकेचे सर्व नॉर्म्स पूर्ण करत आहे. बँकेचे अध्यक्ष माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर व उपाध्यक्ष जगदीश काळे व संचालक मंडळ यांनी स्थितीबाबत समाधान व्यक्त करून मुख्य कार्यकारी अधिकारी एम आर सिरसागर, सर व्यवस्थापक डॉ एम एस शेख, व्यवस्थापक कुंबेफळकर विलास, वसुली अधिकारी लांडे के ए व कर्मचारी वर्ग यांनी ठेवी चे व कर्जाचे दिलेले टारगेट पूर्ण केल्यामुळे कौतुक केले आहे.

## बीड शहरातील सर्वात मोठ्या भव्य मिरवणुकीचे आयोजन तसेच विविध सामाजिक उपक्रम : अथर्व मस्के

बीड । प्रतिनिधी

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ,बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती जगभरात मोठ्या उस्ताहात साजरी होते. त्या अनुषंगाने महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती निम्मित बीड शहरात भव्य मिरवणुकीचे मोठ्या जल्लोषात मोठ्या उस्ताहात साजरी करण्याचे आयोजन महाप्रजापती बहुउद्देशीय सामाजिक संघटनेने केले आहे. बीड शहरात प्रामुख्याने महाप्रजापती बहुउद्देशीय सामाजिक संघटने कडून गेले २१ वर्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्मोस्तव मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात येतो. यंदा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणुकी सह विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यामध्ये रक्तदान शिबिर,आरोग्य शिबिर व अन्नदान या सारखे कार्यक्रम संघटनेच्या वतीने योजले आहेत. १४ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णकृती पुतळयास अभिवादन करुन दु.४ वाजता गणेश नगर येथुन भव्य मिरवणुक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याकडे मार्गस्थ होणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निम्मित भव्य मिरवणुकीत मोठ्या संखेने उपस्थित रहा असे आवाहन संघटनेतील सर्व सभासदांनी केले आहे. तसेच १४ एप्रिल हा दिवस सुवर्ण महोत्सव म्हणुन साजरा करा असे आवाहन महाप्रजापती बहुउद्देशीय सामाजिक संघटनेचे प्रमुख मार्गदर्शक युवा नेते अथर्व मस्के यांनी केले आहे.



**डॉल्बी, लेझर लाईट शो, पारंपारिक वाद्य पथक, रथ देखावा, केरळा येथील सांस्कृतिक वाद्य हे असणार भव्य मिरवणुकीचे प्रमुख वैशिष्ट्य**

# डॉ.आंबेडकर जयंती निमित्त एकता नगर मध्ये रक्तदान शिबिर संपन्न

## रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान; ५१ रक्तदात्यांनी केले रक्तदान

बीड । प्रतिनिधी

बीड शहरात महामानव विश्वरत्न, परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात व आनंदी वातावरणात विविध कार्यकामाचे आयोजन करून साजरी केली जाते. प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी एकता नगर भागात महामानव डॉ.आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले जयंती निमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरास रिपाइंचे जिल्हा अध्यक्ष पप्पू कागदे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रथम डॉ.आंबेडकर यांनच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करून रक्तदान शिबिरास सुरुवात करण्यात आली. या शिबिराचे आयोजन सार्वजनिक जयंती उत्सव समिती एकता नगर, पेठ बीड कडून आयोजन करण्यात आले होते.



सध्या शासकीय रुग्णालयात रक्ताचा तुटवडा जाणवत असल्याने व रक्तदान हेच श्रेष्ठदान असल्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या रक्तदान शिबिरास रक्तदात्यांनी मोठ्या संख्येने सामील होऊन रक्तदान केले. या शिबिरास विविध मान्यवरांनी उपस्थित राहून जयंती उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्याचे कौतुक केले.

सार्वजनिक उत्सव समिती व या भागातील युवकांनी, महिलांनी उपस्थित राहून सहकार्य केले, हे रक्तदान शिबिर जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष नितीन सोनकांबळे, उपाध्यक्ष समाधान वरेकर सचिव विशाल खळगे, सोनू खळगे, पप्पू वाघमारे, अजय डाके, दीपक वाघमारे, सह रि.पा.ई. महीला जिल्हध्यक्ष मायाताई मिसळे, संगीताताई वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली उद्या पासून रांगोळी स्पर्धा, निबंध स्पर्धा, महिलासाठी विशेष संगीत खुर्ची, बास्केट बॉल अशा विविध संस्कृतीत कार्यक्रमाचे आयोजन केले असून या मध्ये मोठ्या संख्येने महिलांनी सहभागी व्हावे असे आवाहन मायाताई मिसळे यांनी केले आहे.

## युवाक्रांती फाऊंडेशनच्या महाराष्ट्र राज्य संघटक पदी प्रिया राठोड यांची निवड

गेवराई । प्रतिनिधी

समाज कार्याबद्दल आवड व महाराष्ट्रभर फाउंडेशन चे काम घराघरापर्यंत पोहोचून एक मोठं संघटन उभा करण्यासाठी असलेली क्षमता पाहून राठोड यांची निवड करण्यात आली आहे. सर्वसामान्या घरातील विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी प्रिया राठोड हे काम करतील त्यामुळे त्यांना मोठी जबाबदारी देण्यात आली आहे.

होतकरू व गरजू विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्य देऊन त्यांच्या शैक्षणिक जीवनात कोणतेही अडचणी येऊ नये व त्यांच्या शिक्षण कोणत्याही कारणास्तव थांबू नये यासाठी महाराष्ट्रभर युवा क्रांती फाउंडेशन हे काही दिवसापासून महाराष्ट्रभर काम करत आहे. महिलांवर होणारे अत्याचार, अन्याय बघता त्यांना संरक्षण फाउंडेशन च्या माध्यमातून देण्याचा ते प्रयत्न करणार आहेत.



**सर्वसामान्य घरातील युवतीला आपलं कर्तुत्व सिद्ध करण्यासाठी संधी**

शाळा, कॉलेज, क्लासेस अशा ठिकाणी शिक्षणाच्या नावावर विद्यार्थ्यांची फसवणूक, आर्थिक लुटमार कोण करत असेल तर फाउंडेशन संपर्क साधावा असे आवाहन युवक्रांती फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तुषार बोरुडे यांनी केले आहे. महाराष्ट्रातील अनेक तरुण–तरुणी फाऊंडेशनला जोडले गेले आहेत. महाराष्ट्रभर एक मोठं संघटन उभा करून एक तरुणी– तरुणाची मोठी फळी निर्माण करणार असून फाउंडेशनचे ध्येयधोरण नुसार काम करून, विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडून त्यांना न्याय देण्यासाठी त्यांच्यासाठी निस्वार्थपणे समाजसेवेचा व्रत्त हाती घेऊन काम करणार आहे. असे प्रिया राठोड यांनी बोलताना सांगितले. या निवडीबद्दल सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे.

# भोजगाव-कोमलवाडी ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत ५० लाभार्थ्यांचे घरकुल मंजूर!

## संबंधित इंजिनिअर यांनी प्रत्यक्ष बांधकामांचा सर्वे करूनच लाभार्थ्यांना हप्ता वितरित करण्याची मागणी!

- कुडाचे किंवा मातीचे घर असलेल्या व बेघर असलेल्या लोकांना तातडीने घरकुल योजनेचा लाभ द्यावा!
- शासनाची दिशाभूल करून फुकटचा मलिंदा लाटणाऱ्या बोगस लाभार्थ्यांवर कारवाई होणे गरजेचे?
- गटविकास अधिकाऱ्यांनी याकडे विशेष लक्ष देण्याची आवश्यकता; गरजू लोकांना घरकुल उपलब्ध करून द्यावे?
- घरकुल योजनेचा लाभ गरजू लोकांना व्यवस्थित मिळावा, यासाठी प्रशासनाने योग्य खबरदारी घेणे आवश्यक?



गेवराई । प्रतिनिधी
लाभार्थ्यांचे घराचे स्वप्न पूर्ण होणार आहे. प्रत्येकाला स्वत:चे घर असावे यासाठी शासन पुढाकार घेत आहे. केंद्र शासन आणि राज्य शासन विविध योजनांच्या माध्यमातून प्रयत्नशील आहे. सुलभ शौचालय योजनांचा लाभ घेऊन त्याचा वापर होणे आवश्यक आहे. घरकुल योजनेअंतर्गत आपले स्वप्नातील घर बांधण्याची ही सुरुवात असून भविष्यात कुटुंबातील सदस्यांची संख्या वाढत जात आहे.




### ज्या लाभार्थ्यांचे बांधकाम सुरू आहे अशा गरजूंना घरकुलाचा हप्ता तात्काळ वर्ग करा!

ज्या लाभार्थ्यांचे नाव मंजुरीत आहे. आणि त्या लाभार्थ्यांचे खरोखरच घराचे बांधकाम सुरू आहे. किंवा त्यांना राहायला मजबूत घरच नाही. खरोखरच घराची आवश्यकता आहे. ज्यामुळे कुडाचे किंवा मातीचे घर असलेल्या आणि बेघर असलेल्या लोकांना स्वत:चे घर मिळण्यास मदत होईल. अशा गरजवंत लाभार्थ्यांना तात्काळ घरकुलचा हप्ता वर्ग करा. आणि ज्या लाभार्थ्यांचे बांधकाम अद्याप सुरू नाही. अशा लाभार्थ्यांना घरकुलचा हप्ता वर्ग करु नये, अशी मागणी होत आहे. तसेच एकाच कुटुंबात डबल-डबल घरकुल उचलले जाते. त्यावर अंकुश ठेवण्यासाठी बारकाईने लक्ष देऊन जो खरोखरच बांधकाम पूर्ण करीन त्याचा हप्ता तात्काळ वर्ग करावा अशी मागणी होत आहे. तसेच कुडाचे किंवा मातीचे घर असलेल्या आणि बेघर असलेल्या लोकांना तातडीने घरकुलचा लाभ द्यावे, घरकुल योजनेचा लाभ हा गरजू लोकांना व्यवस्थित मिळावा, यासाठी प्रशासनाने योग्य खबरदारी घ्यावी अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

गेवराई तालुक्यातील भोजगाव व कोमलवाडी ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरकुल लाभार्थ्यांना आपल्या हक्काचे घर मिळवून देण्याच्या दृष्टीने यंत्रणेने काम करावे, प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरकुल निर्मितीचे काम उत्तम दर्जाचे आणि गतीने होण्यावर विशेष लक्ष देण्यात यावे. हे लक्षात घेऊन शासनाच्या विविध योजनांची अधिक पारदर्शकतेने आणि गतिमानतेने अमंलबजावणी करावी. भोजगाव व कोमलवाडी ग्रूप ग्रामपंचायत अंतर्गत जवळपास ५० लाभार्थ्यांचे घरकुल मंजूर झाल्याची माहिती आहे. तसेच त्यांना पहिला हप्ता वितरित करण्यात आले असल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. परंतु या अगोदर संबंधित असलेले इंजिनीअर साहेबांनी प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात झाली झाली आहे का? शिवाय घरकुल लाभार्थ्यांच्या बांधकामांचा सर्वे करूनच पुढील हप्ता वितरित करण्यात यावा अशी, मागणी काही नागरिकांकडून होत आहे.

तसेच घरकुल बांधकाम तत्परतेने सुरू करावे. ज्या लाभार्थ्यांकडे जमीन नाही, घर बांधायला जागा नाही असे लाभार्थींना प्रथम प्राधान्याने घ्यावे. तसेच जागा असलेल्या मात्र घर नसलेल्या लाभार्थींची स्वतंत्र यादी करावी तसेच गेवराई पंचायत समिती अंतर्गत असलेल्या भोजगाव ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना घरकुल योजनेसाठी जवळपास ५० लाभार्थ्यांचे घरकुल मंजूर असून, लाभार्थ्यांच्या घराची पाहणी तसेच सर्वे करूनच संबंधित इंजिनिअर यांनी घरकुल चा हप्ता लाभार्थ्यांच्या खात्यावर वर्ग करावा. तसेच यामध्ये बोगस लाभार्थी आढळून आल्यास त्यांची नावे तात्काळ हटविण्यात यावे, शासनाची दिशाभूल करून मलींदा लाटणाऱ्यावर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. शिवाय संबंधित इंजिनिअर यांनी बोगस हप्ता लाभार्थ्यांच्या खात्यावर वर्ग करू नये, अशी देखील मागणी होत आहे.पंतप्रधान आवास योजना अंतर्गत ज्या लाभार्थ्याला घरकुल मंजूर झाले व त्यांना पहिला हप्ता देवून सुद्धा घरकुल बांधकामाला सुरुवात केली नाही. अशा लाभार्थ्यांकडून घरकुलाचे पैसे परत करावे, म्हणून एक नोटीस सादर करावी, घरकुलाचे हप्ते नियमितपणे लाभार्थ्यांना मिळतील याकडे यंत्रणेने कटाक्षाने लक्ष द्यावे, असे बीड जिल्हा परिषदेचे सीईओ व संबंधित गटविकास अधिकारी यांनी संबंधित इंजिनिअर यांना सांगावे की, कामांची वेळेत आणि दर्जेदार पूर्तता होण्याच्या दृष्टीने यंत्रणांनी प्रत्यक्ष पाहणीवर भर द्यावा. तसेच बांधकामाची पाहणी वेळेत करावी. हप्ता वितरित केल्यावर घरकुल बांधकामाला सुरु केलेल्या कामाची नोंदणी व्यवस्थित ठेवावी. कामाच्या टप्पानिहाय विहित केल्यानुसार लाभार्थ्यांना हप्ते द्यावे, कोणत्याही राजकीय पुढाऱ्यांच्या सांगण्यावरून किंवा त्यांच्या दबावाला बळी पडून बोगस लाभार्थना घरकुलचा हप्ता वितरित करू नये, जेणेकरून खरोखर आणि गरजू लाभार्थ्यांना लाभ मिळेल.

# बीडमध्ये महाराणा प्रताप यांच्या पुतळ्यासाठी जागा द्या

### सकल राजपूत समाजाचे पालकमंत्र्यांना निवेदन



बीड । प्रतिनिधी
शहरात महाराणा प्रताप यांच्या पुतळ्यासाठी जागा उपलब्ध करून देण्यासह इतर विविध मागण्यांचे निवेदन उपमुख्यंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांना सकल राजपूत समाजाच्यावतीने देण्यात आले. यावेळी समाजबांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.
राजपूत समाजासाठी वीर शिरोमणी महाराणा प्रताप यांचे स्थान अत्यंत पूजनीय आहे. त्यांचे पराक्रम, स्वाभिमान आणि स्वातंर्त्यासाठीचे बलिदान संपूर्ण राष्ट्रासाठी प्रेरणादायी आहे. बीड शहरातील राजपूत समाजासह अन्य नागरिकांच्या मागणीनुसार शहरात एका प्रमुख ठिकाणी महाराणा प्रताप यांचा भव्य पुतळा उभा करण्यात यावा. हा पुतळा केवळ राजपूत समाजासाठीच नव्हे, तर संपूर्ण समाजासाठी इतिहास आणि प्रेरणेचे प्रतीक ठरेल. तसेच, तरुण पिढीला देशभक्ती व स्वाभिमान यांचे महत्त्व पटवून देण्यास उपयुक्त ठरेल. या मागणीस सकारात्मक प्रतिसाद देऊन बीड शहरातील योग्य ठिकाणी महाराणा प्रताप यांच्या पुतळ्यासाठी जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणीही निवेदनाद्वारे अजित पवार यांच्याकडे करण्यात आली.
यावेळी राणा चौव्हाण, किशन चौव्हाण,नितीन राजपूत, प्रणवसिहं बुंदेले, अभयसिहं बुंदेले, अनुपसिंह बुंदेले, अॅड. युवराज बहिरवाळ, अरविंदसिह पाटील, सोनल अरविंदसिंह पाटील, अखिलसिहं बुंदेले, विक्रमसिंह कपुर, ओमप्रकाशसिंह कश्यप, गणेश बहिरवाळ, अशोकसिहं दिक्खत, विजयसिंह ठाकुर, हनुमानसिंह ठाकूर, मोतीसिंग राजपूत, रणवीरसिंग ठाकूर, रामचंद्र परदेशी, विनोदसिंह बुंदेले, रामेश्वरसिंह ठाकूर, ड. दिलीपसिंह ठाकूर यांच्यासह समाजबांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# बीड शहरातील वीजप्रश्नी आ.संदीप क्षीरसागरांनी घेतला आढावा

### शहरात वीजेचा लपंडाव होऊ नये याकरिता दक्षता घेण्याच्या दिल्या सूचना

बीड । प्रतिनिधी
शहरात वीजेच्या संदर्भात होत असलेल्या अनेक समस्यांच्या बाबत आ.संदीप क्षीरसागर यांनी महावितरण विभागाचे अधिक्षक अभियंता श्री.राजपूत यांची भेट घेत आढावा घेतला. तसेच गुरूवारी (दि.३) रोजी बीड शहरात थोडासा पाऊस झाल्यामुळे जवळपास अर्धी रात्र बीड शहरात वीज नव्हती. अशाप्रकारचा वीजेचा लपंडाव होता कामा नये असे निर्देश आ.क्षीरसागर यांनी महावितरण विभागाला दिले.
गुरुवारी (दि.३) रोजी बीड शहरात अल्प प्रमाणात पाऊस झाला होता. पाऊस आल्यानंतर बीड शहरातील जी वीज गायब झाली ते थेट अर्ध्या रात्रीनंतरच आली. त्यामुळे बीड शहरात वीजेच्या लपंडावामुळे जनजीवन विस्कळित झाले होते. वीजवितरण विस्कळीत झाल्यास सुरक्षेसह उद्योग-व्यापारांवरही मोठा परिणाम होतो. त्यामुळे वीज नियमीत आणि सुरळीत असणे गरजेचे आहे.
याबाबत आ.संदीप क्षीरसागर यांनी शुक्रवारी (दि.४) रोजी महावितरण विभागाचे अधिक्षक अभियंता श्री.राजपूत यांची भेट घेतली. शहरातील वीज वितरण व्यवस्था तसेच वितरण व्यवस्था विस्कळीत होण्याची कारणे यांचा सविस्तर आढावा घेतला. आणि यापुढे असा प्रकार होऊ नये असे सूचित केले. यावर अधिक्षक अभियंता यांनी येणार्या काळात अचानकपणे असा वीजेचा लपंडाव होणार नाही याची दक्षता घेऊ असे आ.क्षीरसगरांना सांगितले.



#### २२० के.व्ही. च्या विद्युत मार्गिकेचे काम लवकरच होणार

बीड शहरात राष्ट्रीय महामार्ग विभागाकडून लवकरच २२० के.व्ही. च्या नवीन विद्युत मार्गिकेचे काम सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे बीड शहरात असलेला अतिरिक्त विद्युत भार मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. असेही आ.संदीप क्षीरसागरांकडून सांगण्यात आले आहे.

# भगवानगडाला शंभर घरांच्या गारखेड्याची ६४ लाख रुपये देणगी जाहीर

### करोडो रुपयांचे शिवधनुष्य पेलविण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन

भगवानगड । प्रतिनिधी
श्री क्षेत्र भगवानगडावरील नियोजित श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या करोडो रुपये खर्च असणाऱ्या मंदिरासाठी महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात देणग्या सुरू झालेल्या आहेत. गडाच्या भक्तवर्गांपैकी अनेक गावांनी आपापल्या देणग्या जाहीर करून देणगीची रक्कम गडाचे मठाधिपती, न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांकडे सुपूर्द केली आहे. देणगीचे बाकी असलेले गावकरी बाबांना सप्ताहानिमित्त किंवा इतर धार्मिक कार्यक्रमानिमित्ताने गावात बोलावून बाबांसमोर आपापले देणगीचे आकडे जाहीर करतात. नंतर संपूर्ण ग्रामस्थ एक विशिष्ट तारीख ठरवून बाबांना बोलावून घेतात व जाहीर केलेली देणगी बाबांकडे सुपूर्द करतात. श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती, ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांनी श्री क्षेत्र भगवानगडावर माऊलींचे मंदिर बांधण्याचे ठरविले आणि संपूर्ण महाराष्ट्रातून मंदिरासाठी देणग्यांचा ओघ सुरु झाला आहे. न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा हे मौजे गारखेडा (ता.पैठण जि.संभाजीनगर) येथे आले असता ग्रामस्थांनी गडावरील माऊलींच्या मंदिरासाठी देणगी द्यायचे ठरविले. त्यानुसार ग्रामस्थांनी आपापल्या देणगीचे आकडे जाहीर केले. जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार संपूर्ण आकडेवारीची गोळाबेरीज ही ६४ लाख रुपये झाली. नोकरी/व्यवसायानिमित्ताने बाहेरगावी असणाऱ्या ग्रामस्थांच्या देणगीचे आकडे आणखी बाकी आहेत. एकंदरीत श्री क्षेत्र भगवानगडाचा भक्तवर्ग गडावरील माऊलींच्या मंदिराला आर्थिक स्वरुपात हातभार लावण्यासाठी सरसावलेला दिसून येत आहे. त्यामुळे या अभूतपूर्व मंदिरासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करावे असे आवाहन श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.



हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT